**D**

**CCE PR**
**UN-REVISED**

ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD, MALLESWARAM, BANGALORE – 560 003**

ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಜೂನ್, 2018

**S. S. L. C. EXAMINATION, JUNE, 2018**

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

**MODEL ANSWERS**

ದಿನಾಂಕ : 22. 06. 2018 ] ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

Date : 22. 06. 2018 ] **Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**
**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125

[ Max. Marks : 125

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **विभाग - A**<br>**( गद्य पद्यांशावर आधारीत )** | |
| I. | एका वाक्यात उत्तरे लिहा : $16 \times 1 = 16$ | |
| 1. | वसईवर कोणाचा अंमल होता ? | |
| | **उत्तर :** पोर्तुगीजांचा | 1 |
| 2. | चिं. वि. जोशींच्या मानसपुत्रांची नांवे लिहा. | |
| | **उत्तर :** चिमणराव व गुंड्याभाऊ | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 3. | लेखकाने स्वयंपाकासाठी कोणाची निवड केली ? | |
| | **उत्तर :** एका वयस्कर बाईची | 1 |
| 4. | पिंगपाँग हा खेळ प्रथमतः कोठे खेळला जाई ? | |
| | **उत्तर :** युरोपात | 1 |
| 5. | 'आई समजून घेताना' पाठाचे लेखक कोण ? | |
| | **उत्तर :** उत्तम कांबळ | 1 |
| 6. | खांद्यावरची घागर कशाने भरल्यासारखी वाटते ? | |
| | **उत्तर :** प्रश्नांनीच | 1 |
| 7. | किराणा घराण्याचे संस्थापक कोण ? | |
| | **उत्तर :** अब्दुल करीम खाँ | 1 |
| 8. | 'स्वरगंगा' पाठाचा साहित्यप्रकार कोणता ? | |
| | **उत्तर :** व्यक्ति चित्र | 1 |
| 9. | कवी मुकुंदराज यांचे पूर्ण नांव लिहा. | |
| | **उत्तर :** मुकुंदराज बल्लाळ झारकरी | 1 |
| 10. | रूक्मिणीला किती भाऊ होते ? | |
| | **उत्तर :** पाच | 1 |
| 11. | 'माझ्या माहेराला' कवितेचे मूल्य कोणते ? | |
| | **उत्तर :** कृतज्ञता, अभिमान | 1 |
| 12. | बोक्याने आपली एकादशी कशी मोडली ? | |
| | **उत्तर :** पोपटाला खाऊन मोडली | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 13. | मानवाच्या मुक्तीसाठी काय केले पाहिजे ? | |
| | **उत्तर :** परिस्थितीचे पिंजरे तोडून टाकले पाहिजे | 1 |
| 14. | संत ज्ञानेश्वरांच्या ओव्यांचा कोणत्या शब्दात गौरव केला आहे ? | |
| | **उत्तर :** ओवी ज्ञानेशांची | 1 |
| 15. | आईच्या डोळ्यात पाणी का आले ? | |
| | **उत्तर :** मागच्या पाहुण्यांच्या आठवणीने | 1 |
| 16. | धूमकेतू कशाप्रकारे आर्जवे करतो ? | |
| | **उत्तर :** वेड्याप्रमाणे केस पिंजारून | 1 |
| II. | तीन-चार वाक्यात उत्तरे ( मुद्दे ) : $13 \times 2 = 26$ | |
| 17. | केसोबास यांचा परिचय लिहा. | |
| | **उत्तर :** | |
| | * केसोबास उर्फ केशिराज बास ( तेरावे शतक )<br>* महानुभाव पंथातील जेष्ठ ग्रंथकार, संस्कृत पंडित<br>* महानुभाव पंथाचे दुसरे आचार्य, नामदेवाचार्यांचे पट्टशिष्य<br>* **ग्रंथरचना :** 'श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ' 'मूर्तिप्रकाश' 'लापणिक', 'दृष्टांत पाठ', 'गुढे' → मराठी रचना.<br>'रत्नमालास्तोत्र', 'ज्ञानकलानिधीस्तोत्र', 'दृष्टांतस्तोत्र' → संस्कृत रचना. | 2 |
| 18. | चिमाजी अप्पांनी कोणता निश्चय केला ? | |
| | **उत्तर :** प्रयत्नांची शर्थ करुनही किल्ला हस्तगत होत नाही म्हणून सर्व सरदारांना एकत्रित करून — "किल्ला हस्तगत होत नाही तर मला तोफेच्या तोंडी बांधून माझे डोके किल्ल्यात पाडावे, नाही तर किल्ला घ्यावा." | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 19. | ‘आम्ही अगदी अंधारात होतो.’ संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर :**<br>**संदर्भ** :<br>i) पाठाचे नांव — जपानी स्त्री<br>ii) लेखिका — इंदू साक्रीकर<br>कमीजखाँ यांनी लेखिकेला म्हटले.<br>**स्पष्टीकरण :** एकेकाळी या स्त्रिया हिंदी स्त्रियांपेक्षा अगदी मागे, गोषात राहणाऱ्या जपानी स्त्रिया पुढारल्या कशा ? लेखिकेला पडलेल्या या काड्याचे उत्तर देताना कमीजखाँ ने लेखिकेला म्हणाल्या. | 2 |
| 20. | कविला कावळ्याने कोणता शकून सांगावा असे वाटते ? कवी त्याला काय देऊ इच्छितो ?<br>**उत्तर :** कवी कावळ्याला आपला आवडता पाहुणा ( पांडुरंग ) यावा असा शकून सांगावा असे वाटते.<br>त्यासाठी कवी त्याला दहीभाताची उंडी, दुधान भरलेली वाटी, रसाळ आंब्याची डहाळी देऊ ईच्छितात. त्याचप्रमाणे त्याचे पाय सोन्याने मढवण्याचे सांगतात. | 2 |
| 21. | पाहुणे कसे निगरगट्ट आहेत ते सांगा.<br>**उत्तर :** पाहुणा आगंतुक आहे. ठाण मांडून बसतो. जायचा विचार करत नाही. राजरोसपणे स्वयंपाक घरात जावून खाऊचा डब्बा उघडा करुन पदार्थ खातो. बाबांच्या पेटीतील विड्यांचे जुडगे पळवितो. घरातील गृहिणी वैतागून गेली आहे. | 2 |
| 22. | ‘कुठून आणतात तेल हळदीच्या वाटीचे बळ’ संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर :**<br>**संदर्भ** :<br>i) कवितेचे नांव — सुन्या तिच्याही दाही दिशा<br>ii) कवयित्रीचे नांव — अनुराधा पाटील<br>काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रीचे वर्णन करताना.<br>**स्पष्टीकरण :** काबाडकष्ट करणारी स्त्री असह्य वेदना सहन करते. सगळ्याच ऋतूत तिचे कष्ट चालूच असते. न संपणाऱ्या कष्टाच्या फुफाट्यातून चालताना हालअपेष्टा सोसूनही आशावादी आहे. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 23. | जपानच्या प्रगतीला कोणत्या दोन गाष्टी कारणीभूत ठरल्या ?<br>**उत्तर :**<br>i) 1819 साली झालेला भूकंप<br>ii) 1945 साली झालेला बॉब हल्ला<br>— ही दोन महाभयानक संकटे. | 2 |
| 24. | जपानी स्त्रिया कोणकोणती कामे करतात ?<br>**उत्तर :** ट्रॅम कंडक्टर, बस कंडक्टर, दुकानातीळ विक्रेत्या, हॉटेलमधील वाढपी, लिप्टमन, बूटपॉलीश करणे, केस कापणे. इत्यादी. | 2 |
| 25. | लेखकाच्या जेवणात कोणकोणते पदार्थ होते ?<br>**उत्तर :** घट्ट पिठले, तळलेल्या भोपळी मिरच्या, ज्वारीची पोपडेदार मुलायम भाकरी, बेसनच्या उंड्यावर तापवलेले जवसाचे तेल सर्व काही उनऊनीत पदार्थ. | 2 |
| 26. | आईने लेखकास कोणते आश्वासन दिले ?<br>**उत्तर :** ''तू तर शिकला पाहिजेस. तुझ्यामुळेच आमचं नशीब उजाडणार, पण खर्चाचं काय करायचं ? मजुरी तर वाढत नाही, पाऊसही पडत नाही. पण तू काळजी करु नकोस. तू शिक, आणखी राबेन मी.'' | 2 |
| 27. | चांगल्या शिष्याचो लक्षणे सांगा.<br>**उत्तर :** मनाने उदार असावा, सत्यमार्गाने चालणारा, निर्मळ मनाचा, मुक्तीच्या मार्गावर जाणारा, गुरुसेवेत तत्पर असणारा, ज्ञानी असावा. | 2 |
| 28. | परार्थीचा आप्तविस्तार कसा असतो ?<br>**उत्तर :** अनेक देशभक्तांनी परहितासाठी आपले प्राण त्याग केले. स्वार्थ हेतूला बाजूला ठेवून जनसेवा केली. स्वतःचे दुःख बाजूला ठेवून देशहितालाच प्राधान्य दिले. त्यांच्या आप्तविस्तारात संपूर्ण देश सामावलेला आहे. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 29. | सासर आणि माहेर यातील फरक कसा सांगितला आहे ?<br>**उत्तर :** माहेराची ओढ प्रत्येक स्त्रीला असते. माहेरचे कौतुक करण्यास तिला आवडते. सासरी पंचपक्वानाचे जेवण असले तरी त्याला आईच्या भाजी भाकरीची चव नाही. सासरच्या वाटेवर कुचकुच काटे बोचतात. पण माहेरची वाट ही मऊभार हिरवळीची आहे. | 2 |
| III. | पाच-सहा वाक्यात उत्तरे ( मुद्दे ) : 10 × 3 = 30 | |
| 30. | 'विद्या महासागरासारखी आहे' म्हणजे काय ?<br>**उत्तर :** विद्या सर्वांना अवगत असावी. विद्येशिवाय माणसाला शांतता नाही. आणि माणुसकीही नाही. विद्या ही अथांग आहे. विद्यशिवाय माणूस पशूसमान आहे. माणसाला जगण्यासाठी अन्नाची आवश्यकता तसेच विद्येचीही आवश्यकता आहे. ज्ञानाशिवाय माणूस काहीही करु शकणार नाही. | 3 |
| 31. | लेखक काय वापरण्याच्या विरोधात आहे ? दुकानदाराला आश्चर्य का वाटले ?<br>**उत्तर :** लेखक पावसाळ्यात छत्री वापरण्याच्या विरुद्ध आहेत. दुसऱ्यांसाठी छत्री विकत घ्यावी लागते. जुन्या बाजारात जातात. कमीत कमी किमतीची छत्रो दाखवण्यास सांगतात. दुकानदार वीस पंचवीस रुपयाची छत्रो दाखवतो. पण लेखक कोपऱ्यातोल फाटलेली छत्री, बारा रुपयाची छत्री विकत घेतात. | 3 |
| 32. | लेखकाच्या सायकल प्रवासाचे वर्णन करा.<br>**उत्तर :** निकाल सांगण्यासाठी लेखक व चुलत भाऊ मित्राच्या गावी वाडेगावला जातात. सायकल प्रवास कच्चा रस्ता निवडतात. उभ्या पिकांमधून, नागमोडी जाणाऱ्या पांदणीच्या सगसगराने निघतात. धुळीचा खकाणा नाकात घुसत होता. पांदणीच्या मधोमध वाढलेल्या काटेरी झुडूपांना लागलेल्या वंगणाने कपडे आणि अवतार दरवेशासारखा झाला. एखादे झुडूप स्पोकमध्ये अडमडे, फडर्र् असा चमत्कारिक आवाज येत होता. सायकल पंक्चर घेऊ नये म्हणून काळजी. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 33. | शेवटी गणातात्यांनी कोणता निर्णय घेतला ? का ?<br>**उत्तर :** गणातात्यांना आपली दोघांची वाटणी मान्य नसल्यामुळे तिसऱ्या वाटणीला तयार नसतात. तोडगा निघत नाही. वैतागून नवराबायको एकत्र राहणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. पोटगी न मिळाल्यास राबून खाण्याची तयारी दाखवतात. | 3 |
| 34. | 'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणत आहे ?<br>**उत्तर :** मानव जन्म हा एकदाच मिळतो. तो एक शुभयोग आहे. पुन्हा पुन्हा हा जन्म मिळत नाही, म्हणून सदाचाराने जगावे. परमेश्वर भक्तीचा भुकेला आहे. उगाच जटा वाढवून, अंगावर भस्म ओढून भक्ती करू नकोस. ढोंगीपणा करून लबाडी करून जीवन वाया घालू नये. परमेश्वर चिंतनात आपला वेळ घालवावा. | 3 |
| 35. | कृष्ण, कर्ण, सौभद्र, मार्कंडेय यांचे दाखले स्पष्ट करा.<br>**उत्तर :**<br>सैनिक देशभक्त, द्रष्टे समाजसेवक, संत यांचा गौरव.<br>**कृष्ण :** पांडवांची बाजू घेऊन सत्याची कास धरली. अधर्माविरूद्ध लढला.<br>**कर्ण :** दानशूर कर्ण. पांडवांचा भाऊ असून सुद्धा मैत्रीशी एकनिष्ठ राहून प्रामाणिकपणे लढला.<br>**सौभद्र :** पराक्रमी होता. सौभद्र ( अभिमन्यू ) मृत्यू समोर अटळ उभा आहे. असे माहित असूनही जिवाची पर्वा न करता कौरवांशी लढतो.<br>**मार्कंडेय :** एक ऋषी अल्पायुषी असूनही शंकराची उपासना करून दीर्घायुषी बनला. मृत्यूवर विजय मिळविला. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 36. | पृथ्वी सूर्याची याचना कशी करत आहे ? तिची सध्याची अवस्था कशी आहे ?<br>**उत्तर :** पृथ्वी सूर्याची प्रेमासाठी याचना करत आहे. ''युगानुयुगे निघून गेली, तुझे प्रेम मिळविण्यासाठी तुझ्या कक्षेत फिरत आहे. तरीही आजपर्यंत तुझे प्रेम मला मिळाले नाही, अशी माझी प्रतारणा का करतोस ?''<br>तारूण्यातले दिवस निघून गेले. जोर, आवेग, प्रभाव ओसंडून गेला. यौवनाच्या मशाली विझून गेल्या. आता फक्त निराशारूपी अंधार उरलेला आहे. | 3 |
| 37. | स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?<br>**उत्तर :** पहाटे लवकर उठून दळण दळते. कमी पिठात कोंड्याचा मांडा करून जगते. तान्हेमूल पाटीखाली घालून काम करते. उन्हापासून संरक्षणासाठी पायाला पाला बांधते. तिच्या घामाच्या धारेतूनच शिवार पिकते. मात्र तिच्या अंगणात पालापाचोळा आहे. घोटभर पाण्यासाठी रानोमाळ भटकते. | 3 |
| 38. | बेळगांवी कॉंग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.<br>**उत्तर :** 1924 मध्ये बेळगांवी कॉंग्रेस अधिवेशन महात्मा गांधीजींच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यावेळी व्यासपिठावर नेहरू, महम्मद अली जिना, गंगाधर देशपांडे अशी बडी मंडळी हाती. या सभेचे स्वागतगीत गंगूबाई व त्यांच्या शाळेतील इतर विद्यार्थीनीनी गाईले. तेव्हा गंगूबाईंचे वय केवल 11 वर्षाचे होते. प्रत्यक्ष गांधीजीनी त्यांना शाबासकी दिली. | 3 |
| 39. | श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रूक्मिणी काय करणार आहे ?<br>**उत्तर :** हे श्रीकृष्णा मला शिशुपालाशी लग्न करायचे नाही, म्हणून तू मला राक्षस पद्धतीने पळवून ने, ही जर माझी इच्छा पूर्ण न झाली तर मी माझी जीभ हासडून जीव देईन. त्यानंतर पुढे शंभर जन्म घेवून उग्र तपश्चर्या करेन आणि प्रत्यक्ष भगवान शंकरही वंदन करतो, असे तुझे पाय मी मिळवेन. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IV. | आठ - दहा वाक्यात उत्तरे ( मुद्दे ) : 5 × 4 = 20 | |
| 40. | ‘हिरवे सांगाती’ पाठातील सर्व वृक्षांची वैशिष्ट्ये लिहा.<br>**उत्तर :**<br>**पिंपळ :** पुरातन वृक्ष, पिंपळाचा प्रत्येक अवयव औषधी पूर्वजांनी देवाचं स्वरूप मानून पूजा. वाटसरूना छाया.<br>**जांभूळ :** गारवा देणारा, वयस्कर व्यक्तीप्रमाणे लक्ष ठेवणारा. अतिशय पसरलेला, आशीर्वाद देणारा.<br>**बांबू :** खूप वर्ष बांबू देतं. वनाचा नाश होताना फूलं येतात. बांबूच्या वनातला ‘सोय सोय’ शीळ घालणारा वारा जणू ‘साई साई’ असं देवाचे नांव घेतो.<br>**कडूनिंब :** पांढरी पिवळसर छोटी छोटी फुले जणू झुमकेच आहेत.<br>**गुलमोहोर :** दरवर्षी लालेलाल मुकूट घालून त्याच्या फुलांच्या पऱ्या अंगणात उतरतात.<br>**चाफा :** पान तोडलं की दूधासारखा पांढरा चिक् ‘बडी माँ’ म्हणतात. फुले आली की पाने गायब, पाने आली की फुले गायब. पानाफुलांचा लपंडाव.<br>**पपया :** तीन वेळा फळं दिलं की हे झाड मरत.<br>**बदाम :** पाने लाल होता होत हिरवळीवर पडतात. चंद्रही पिवळसर केसरी जणू तोही पिकल्या पानासारखा टपकन् हिरवळीवर पडेल. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
| --- | --- | --- |
| 41. | फुले शाळेत कशाप्रकारे मश्गूल असायचे ? त्यांनी सावित्रीबाईना कशाप्रकारे शिकविले ?<br>**उत्तर :** सावित्रीबाई फुलेना शेटजी म्हणत. पुस्तके वाचनात मग्न असत, वाचन, मनन, चिंतन, करण्यात वेळ घालवत. सतत अभ्यास करत.<br>सावित्रीबाईनी फुलेकडे शिकण्याची इच्छा व्यक्त केली, नगरला जावून सदाशिव गोवंडे यांना घेऊन फरार नावाच्या मॅडमना भेटून अध्यापनाचे धडे घेतले. येताना शिकविण्याच्या निर्धाराने पाटी, पेन्सिल घेऊन आले. प्रथम तिच्या आवडीचा शब्द 'शेटजी' गिरविण्यास सांगितला. नंतर क,-ख-,ग,-घ अशी अक्षरे गिरविण्यास सांगितले. | 4 |
| 42. | 'या भारतात बंधुभाव' कवितेचा सारांश लिहा.<br>**उत्तर :** भारतात एकता नांदावी, सर्वधर्म समभाव रहावा व अस्पृश्यता नष्ट होऊन सर्वांनी गुण्यागोविंदाने रहावे अशी तळमळ व्यक्त केली आहे.<br>भारतात बंधूभाव असावा. सर्वपंथ जात धर्म एक असावेत. गरीब श्रीमंत एकमताने राहावत. सर्वाना मानवता धर्म कळावा. सामुदायिक प्रार्थना व्हाव्यात. तरुण शीलवान व उद्योगी व्हावेत. दृष्ट लोकांचे मन परिवर्तन व्हावे. त्यांच्याजवळ सत्य, न्याय, वृत्ती यावी. स्वातंत्र्याचे सुख सर्वांना मिळावे. आणि तुकडोजीला तुझ्या सेवेमध्ये रमू दे. | 4 |
| 43. | 'काया मातीत' कवितेतील निसर्ग वर्णन तुमच्या शब्दात लिहा.<br>**उत्तर :** या ग्रामीण कवितेत निसर्गाचे सुंदर वर्णन केले आहे. शेतातील माती काळीभोर आहे. पावसाने ढग निरभ्र झाले आहेत. विजांचा कडकडाट होत आहे. विज थयथय नाचत आहे. ढग ढोल वाजवत आहे. सरीवर सरी येतात. तशी माती न्हावून निधते. मातीचा सुगंध कस्तुरीच्या सुवासाप्रमाणे जाणवतो. वर आलेली पिंक जणू भजन करत आहे. गहू जोंधळा बहरलेला आहे. फुललेला कापूस चांदीप्रमाणे लकाकत आहे. | 4 |

<table>
<tr><th>प्रश्न क्रमांक</th><th>अचूक उत्तरे</th><th>गुण</th></tr>
<tr><td>44.</td><td>पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा. 4<br>त्या काळी धरणीच्या ................................................<br>........................................................................<br>........................................................................<br>................................................ आज असे सत्कार.<br>उत्तर :<br>कविता :<br>त्या काळी धरणीच्या पोटी<br>या इवल्या बिजाच्या ओठी<br>थरथरली स्फुरली होती हो श्रद्धेची ललकार<br>पहिला हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार.</td><td>4</td></tr>
<tr><td></td><td>विभाग - B<br>( व्याकरणावर आधारीत )</td><td></td></tr>
<tr><td>V.<br>45.</td><td>पर्यायी उत्तरे ( बरोबर उत्तरास 1 गुण ) : 10 × 1 = 10<br>‘निरक्षर’ ही संधी अशी सोडवतात<br>(अ) नि + अक्षर (ब) निर + क्षर<br>(क) निः + अक्षर (ड) नि + क्षर<br>उत्तर : (क) निः + अक्षर</td><td>1</td></tr>
<tr><td>46.</td><td>‘गंगूबाईनी देशप्रेमाचे धडे गिरवले.’ या वाक्यात ‘गंगूबाई’ याला या विभक्तीचा प्रत्यय लागतो.<br>(अ) प्रथमा (ब) तृतीया<br>(क) पंचमी (ड) द्वितीया<br>उत्तर : (अ) प्रथमा</td><td>1</td></tr>
</table>

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | | | गुण |
|---|---|---|---|---|
| 47. | 'मांजर दूध पिते.' हे या प्रयोगाचे उदाहरण आहे. | | | |
| | (अ) कर्तरी | (ब) भावे | | |
| | (क) कर्मणी | (ड) यापैकी नाही | | |
| | **उत्तर :** (अ) कर्तरी | | | 1 |
| 48. | 'कुत्र्याला काठोने मारले' या वाक्यातील काळ | | | |
| | (अ) भूतकाळ | (ब) वर्तमान काळ | | |
| | (क) रिती भूतकाळ | (ड) भविष्य काळ | | |
| | **उत्तर :** (अ) भूतकाळ | | | 1 |
| 49. | 'डोळ्यात केर कानात .............' म्हण पूर्ण करा. | | | |
| | (अ) कचरा | (ब) काठी | | |
| | (क) फुकर | (ड) कर्णफुले | | |
| | **उत्तर :** (क) फुंकर | | | 1 |
| 50. | 'चे चकाकते ते सोने नव्हे' या वाक्याचा प्रकार | | | |
| | (अ) संयुक्त वाक्य | (ब) मिश्र वाक्य | | |
| | (क) आज्ञार्थी वाक्य | (ड) नकारार्थी वाक्य | | |
| | **उत्तर :** (ब) मिश्र वाक्य | | | 1 |
| 51. | 'ज्ञान प्रकाश' हे या समासाचे उदाहरण | | | |
| | (अ) विभक्ती तत्पुरुष समास | (ब) द्विगू समास | | |
| | (क) अव्ययीभाव समास | (ड) बहुर्विही समास | | |
| | **उत्तर :** (अ) विभक्ती तत्पुरुष समास | | | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 52. | 'स्वतःला आलेला अनुभव' शब्दसमूहाला एक शब्द<br>(अ) परानुभव (ब) स्वानुभव<br>(क) अनुभव (ड) व्यक्तीनुभव<br>**उत्तर :** (ब) स्वानुभव | 1 |
| 53. | 'बाळ <u>दुडूदुडू</u> पळते' अधोरेखित शब्दाची जात कोणती ?<br>(अ) क्रिया पद (ब) विशेषण<br>(क) क्रिया विशेषण (ड) सर्वनाम<br>**उत्तर :** (क) क्रिया विशेषण | 1 |
| 54. | संस्कृत मधून जसेच्या तसे आलेले शब्द<br>(अ) मराठी (ब) संस्कृत<br>(क) तत्सम (ड) तद्भव<br>**उत्तर :** (क) तत्सम | 1 |
| VI. | तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द ( बरोबर उत्तरास 1 मार्क ) : $4 \times 1 = 4$ | |
| 55. | कुसुम : फूल : : पद्म : .............<br>**उत्तर :** कमळ, अंबुज, पंकज | 1 |
| 56. | देव : दानव : : दिवस : .............<br>**उत्तर :** रात्र | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 57. | उद्‌गारवाचक : ! : : संयोग चिन्ह : .............<br><br>**उत्तर : –** | 1 |
| 58. | माकड : माकडीण : : मोर : .............<br><br>**उत्तर :** लांडोर | 1 |
| VII. | सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे ( मुद्दे ) : 3 × 2 = 6 | |
| 59. | 'ही गाडी जावयाची आहे.' अलंकार ओळखून लक्षणे लिहा.<br><br>**उत्तर :**<br><br>अलंकार → श्लेष ओळखणे - 1<br><br>व्याख्या → एकाच शब्दाचे दोन पेक्षा अधिक अर्थ होतात. व्याख्या - 1<br><br>जावयाची → मुलीच्या नवऱ्याची<br><br>जावयाची → जाणारी. | 2 |
| 60. | 'मना सज्जना भक्तिपंथेचि जावे.' गण पाडून वृत्त ओळखा.<br>**उत्तर :**<br>मना सज्जना भक्तिपंथेचि जावे<br>U – – \| U – – \| U – – \| U – –<br>गणः य, य, य, य, वृत्ताचे नाव – 1<br>अक्षरे : 12 गण – 1<br>वृत्ताचे नाव : भुजंगप्रयात | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 61. | खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.<br>i) पांग फेडणे<br>ii) कैलासवासी होणे<br>**उत्तर :**<br>वाक् प्रचारांचा अर्थ सांगणे $\frac{1}{2}$<br>वाक्यात उपयोग करणे $\frac{1}{2}$<br>i) ऋण फेडणे<br>ii) मरण पावणे.<br>( वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग व्हावा अर्थाचा नव्हे ) | 2 |
| | **विभाग - C**<br>**( रचनेवर आधारीत लेखन )** | |
| VIII. 62. | खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर कल्पनेचा विस्तार करा.<br>i) जया अंगी मोठेपण तया यातना कठीण<br>ii) रक्तदान हे श्रेष्ठदान.<br>**उत्तर :**<br>i) कल्पनेचा अर्थ सांगणे ( शब्दशः अर्थ ) 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IX. 63. | तुमच्या परिसरातील केरकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेला विनंती अर्ज लिहा.<br><br>**किंवा**<br><br>तुमच्या भावाच्या हृदय शस्त्रचिकित्सेसाठी मदत करणाऱ्या तुमच्या मित्राचे आभार मानणारे पत्र लिहा.<br><br>**उत्तर :**<br>i) प्रेषक पत्ता 1<br>ii) मायना 1<br>iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2<br>iv) शेवट सही $\frac{1}{2}$<br>v) कोणाला पाठवायचे त्याचा पत्ता $\frac{1}{2}$ | 5 |
| X. 64. | खालीलपैकी एका विषयावर **15** ते **20** ओळीत निबंध लिहा :<br>i) स्त्री भ्रूणहत्या.<br>ii) मी भारतमाता बोलते.<br>iii) पर्यावरणाचे रक्षण काळाची गरज.<br><br>**उत्तर :**<br>i) आकर्षक सुरुवात 1<br>ii) विषय ज्ञान 2<br>iii) भाषा सजावट ( अलंकार वगैरेचा वापर ) 1<br>iv) शेवट. 1 | 5 |